Volume - 4 (2023)
Special Issue - 2 (April)
RESEARCH HUB
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal
ISSN
2582-9173
Website : www.researchhub.org.in/research-hub !! Email : researchhubjournal@gmail.com

# भारतातील मानवी हक्क

**डॉ. सुनील अखंडे**
अंशकालीन प्राध्यापक
जवाहरलाल नेहरू कला
वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय वाडी, नागपूर.

---

भारत हा एक जगातील सर्वात मोठा लोकशाही प्रधान देश आहे. लोकशाही शासनपद्धतीत प्रत्येक व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास घडवून आणणे हा सर्वात महत्त्वपूर्ण उद्देश असतो. या अनुषंगाने १०डिसेंबर १९४८ ला संयुक्त राष्ट्र संघटनेने जे जागतिक मानवी हक्काचे घोषणापत्र संमत केले त्या घोषणापत्रातील महत्त्वपूर्ण तरतुदी, भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेत, विशेषता राज्यघटनेतील मूलभूत हक्काच्या प्रकरणात, तसेच भारतीय राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्वे आणि नागरिकांची कर्तव्य यामध्ये अग्रेषित झाल्याचे दिसून येते. या अनुषंगाने भारतातील मानवी अधिकाराचा आढावा प्रस्तुत लेखात घेण्यात येत आहे.

**मानवी हक्काचा इतिहास -**

मानवी हक्कांची खरी सुरुवात इंग्लंडमधील मॅग्नाकार्टा या शहरापासून झाली. १२१५ मध्ये इंग्लंडमधील हुकूमशाही जुलमी राज्याच्या राजवटीला स्थानिक जनतेने विरोध केला. त्याच्याविरुद्ध बंड पुकारले. संघर्ष झाला आणि राजाला आपली सत्ता जनतेच्या हाती द्यावी लागली. जनता अन्यायातून, गुलामगिरीतून मुक्त झाली. स्वतंत्र झाली. पुढे १६२८ मध्ये मानवी हक्कासंबंधी 'पिटीशन ऑफ राइट्स' मांडले गेले. त्याला अनुसरून १६८९ मध्ये 'बिल ऑफ राइट्स' निर्माण झाले. अमानुष सत्तेच्या विरोधात, हुकूमशाहीच्या विरोधात युध्दे झाली. त्यामध्ये १६७६ चे अमेरिकन स्वातंत्र्य युद्ध, १७८९ ची फ्रेंच राज्यक्रांती,१९१७ ची रशियन राज्यक्रांती, पहिले महायुद्ध आणि १९४५ च्या दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक अशांतता, मनुष्यहानी व विध्वंस कमी करण्यासाठी जागतिक स्तरावर १९४५ मध्ये संयुक्त राष्ट्र संघटनेची स्थापना करण्यात आली. या संयुक्त राष्ट्रसंघटनेने१९४८ ला आपला जाहीरनामा प्रसिद्ध केला. या जाहीरनाम्यात मानवाच्या नैसर्गिक व नागरी हक्काला मानवी हक्क म्हणून मान्यता देण्यात आली.

**भारतीय स्वातंत्र्यपूर्व काळात मानवाधिकाराची स्थिती -**

निसर्गाने माणसाची उत्पत्ती केली आणि स्वातंत्र्य हा निसर्गदत्त अधिकार त्याला प्रदान केला. परंतु या जगातील बुद्धिमान मानव प्राण्यांनी आपला स्वार्थ जोपासण्यासाठी सत्ता, संपत्ती यांच्या बळावर काही मानवी जीवांचे निसर्गदत्त अधिकार हिसकावून घेतले आणि त्यांना गुलामीचं दुखःद जीवन जगायला भाग पाडल अशा अवस्थेत फ्रेंच राज्यक्रांतीच्या काळात मानवी हक्काच्या संदर्भात खूप विचारविनिमय होऊन फ्रान्सच्या राष्ट्रीय सभेने (National Assembly ) मानव व नागरिक यांच्या हक्काचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. यात असा निर्देश केला की सर्व मानव जन्मतःच स्वतंत्र आहेत. फ्रेंच राज्यक्रांतीने स्वातंत्र्य, समता,बंधुभाव,या तीन महान तत्वांचा पुरस्कार केला. आणि त्यामुळे मानवी हक्काचा सर्वत्र आग्रह धरला जाऊ लागला. दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर संयुक्त राष्ट्रसंघ या आंतरराष्ट्रीय संघटनेने जागतिक शांततेसाठी मानवी हक्काचे रक्षण आपले एक प्रमुख उद्दिष्टे आहे. असे घोषित केले संयुक्त राष्ट्रसंघाच्या या घोषणेनंतर मानवी हक्कांच्या प्रश्नाला विशेष महत्त्व

प्राप्त झाले.

**भारतातील मानवी हक्कांचा विकास -**

स्वातंत्र्यपूर्व काळातही भारतात मानवी हक्कासंबंधीची तत्वे स्वीकारली १८९५ मध्ये लोकमान्य टिळकांच्या प्रेरणेने तयार करण्यात आलेल्या भारतीय घटना विधेयकात सर्वात प्रथम मूलभूत हक्काची मागणी करण्यात आली होती. अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या १९२९ च्या ठरावातही सामाजिक, आर्थिक पुनर्रचनेचे मुद्दे ठळकपणे मांडण्यात आले. १९३९ च्या ठरावानंतर सप्रू समितीनेही आपल्या घटनाविषयक प्रस्तावात, भारतीय घटनेत मूलभूत हक्कांचा जाहीरनामा आवश्यक असल्याची शिफारस केली होती.१३डिसेंबर १९४६ रोजी जवारलाल नेहरू यांनी अशा एका स्वातंत्र्य सार्वभौम गणराज्यासाठी घटना परिषदेत असा ठराव मांडला.

भारतात मात्र सामाजिक आणि आर्थिक विषमता अधिक होती. सततच्या परकीय आक्रमणामुळे सांस्कृतिक आणि राजकीय विषमता जोर धरू लागली होती. स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे. असे म्हणणाऱ्या लोकमान्य टिळकापासून आर्थिक विषमता कमी झाल्याशिवाय सामाजिक स्वातंत्र्य प्रस्थापित होणार नाही. अशी भूमिका घेणारे आगरकर, ज्ञानाची दारे सर्वांसाठी खुली करणारे फुले दांपत्य, संविधानाच्या माध्यमातून कायद्याचे संरक्षण उपलब्ध करून देणारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर, अस्पृश्यता नाहीशी व्हावी म्हणून झटणारे महात्मा गांधी, असे अनेक सुधारक मानवी हक्कांचे पुरस्कर्ते होते.

**भारतातील मानवाधिकार -**

महान शांततेचा पुजारी म्हणून ओळखला जाणारा भारत देश हा संयुक्त राष्ट्रसंघटनेचा एक सक्रिय सदस्य आणि त्या आधारावर भारताच्या संविधानात त्या सर्व विचार आदर्श व मानकाचा आणि शब्दावलीचा उल्लेख आहे. आपल्या संविधानाचा भाग तीन (अनुच्छेद १२ ते ३५) मूलभूत अधिकारांची घोषणा करतो.तर भाग चार (अनुच्छेद ३६ ते ५१) राज्याच्या नितीनिर्देशक तत्त्वाचे वर्णन, तसेच मानवाधिकाराचे संरक्षण आणि त्यासंबंधी जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने, सप्टेंबर १९९३ मध्ये राष्ट्रीय मानवाधिकार आयोग राष्ट्रपतीच्या एका अध्यादेशाद्वारे १९९३ ला स्थापन १९९४ मध्ये एक विधीनियम पारित करून राज्यामध्ये मानव अधिकार आयोग स्थापन करण्याचे प्राधान्य केले गेले.

**भारतीय संविधान आणि मानवी हक्क -**

संयुक्त राष्ट्रसंघाने स्वीकारलेल्या मानवी हक्कविषयक सार्वत्रिक जाहीरनाम्याचे प्रतिबिंब भारतीय राज्यघटनेत पडले असल्याचे आपणास दिसून येते. भारतीय संविधानातील सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, गणराज्य, तसेच सामाजिक आर्थिक व राजनैतिक न्याय, विचार अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा, व उपासना यांचे स्वातंत्र्य, दर्जाची व संधीची समानता, व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता देणारी बंधुता या सर्व मूल्यांचा समावेश भारतीय संविधानात असल्याचे दिसून येते. तसेच भारतीय नागरिकाला संविधानाअंतर्गत घटनेच्या कलम १२ ते ३५ अन्वये सहा मूलभूत अधिकार प्रदान केलेले आहेत. या सर्व मूलभूत अधिकारांना भारतीय राज्यघटनेत संरक्षण उपलब्ध आहे. न्यायालयीन संरक्षणात घटनात्मक उपाय योजनेचा अधिकार आहेत. त्याचा उद्देश भारतात मानवी हक्क संरक्षण अधिनियम १९९३ मध्ये लागू झाला. अतिशय महत्त्वपूर्ण अशा आंतरराष्ट्रीय महत्त्वाच्या विषयावरील हा अधिनियम आहे. भारतीय शासनाने १९९३ मध्ये मानवी हक्काच्या संबंधीचा अध्यादेश जारी केला व नंतर संसदेच्या मान्यतेने या अध्यादेशाला अधिनियमाचे

स्वरूप देऊन एक अतिशय मौलिक अशी सुविधा भारतीय जनतेला प्राप्त करून दिली.

**भारतीय मानवाधिकार आयोग** -

राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाची स्थापना भारतात २७ सप्टेंबर १९९३ मध्ये भारताच्या राष्ट्रपतींनी त्यासाठी जारी केलेल्या एका अध्यादेशान्वये करण्यात आली. राज्य स्तरावरही अशा प्रकारच्या आयोगाची स्थापना करण्याचे प्रावधानही एका अन्य अध्यादेशामध्ये करण्यात आले. राष्ट्रपतीच्या अध्यादेशाचे कार्यान्वयन करण्यासाठी भारतीय लोकसभेमध्ये एक मानवाधिकार संरक्षण विधेयक पारित करण्यात आले. त्यास राष्ट्रपतींची स्वीकृती मिळाल्यावर ८ जानेवारी १९९४ रोजी त्या विधेयकाने अधिनियमाचे स्वरूप धारण केले, ज्याचं मानवाधिकार संरक्षण अधिनियम म्हणून गणण्यात आले. या अधिनियमात राष्ट्रीय मानवाधिकार आयोग राज्यस्तरीय मानवाधिकार आयोग व जिल्हास्तरीय मानवाधिकार न्यायालयांचे गठन करण्यासाठी प्रावधान करण्यात आले.

संसदीय कायद्याद्वारे निर्माण झालेली ही संस्था असून मानवी हक्काच्या संवर्धनात मध्यवर्ती भूमिका बजावते. तसेच भारताने नागरी व राजकीय हक्कांवरील आंतरराष्ट्रीय करण्यास हातचा राखूनच मान्यता दिली आहे. उदा. मानवी हक्काचे उल्लंघन झाल्यास घ्यावी लागणारी नुकसान भरपाई ठरविण्याचा अधिकार भारताने स्वतःकडे ठेवला आहे.

**निष्कर्ष** - मानव हा एक बुद्धिमान व विचार करू शकणारा प्राणी आहे. त्याला स्वतःचे स्वातंत्र्य व प्रतिष्ठा अबाधित ठेवण्याकरिता जन्माबरोबरच काही अधिकारही प्राप्त झालेले असतात प्रत्येक माणसाला जीवन जगण्याचा सामाजिक प्रतिष्ठेचा आणि सुरक्षिततेचा अधिकार आहे. मानवाच्या स्वाभाविक प्रतिष्ठेचा आणि गुणवत्तेचा आदर करणे हा मानवी अधिकाराचा आधार आहे. ते एक मूल्य आहे. भारतीय राज्यघटनेनेही हा एक मूलभूत अधिकार मानला आहे. मानवी अधिकाराची संकल्पना ही लोकशाही, न्याय,स्वातंत्र्य,समता, बंधुता, आणि मानवी प्रतिष्ठा हया संकल्पनांशी संबंधित आहे.

मानवतेची मूल्य सार्वत्रिकतेने लागू करण्याचा प्रयत्न करणे हा हेतू मानवी अधिकारांमागे आहे. याच बरोबरीने संस्कृतीच्या आणि परंपरांच्या सीमा ओलांडणे आणि न्याय शांततापूर्ण व शाश्वत विश्वाची निर्मिती करणे हा उद्देशही यामागे आहे.

**संदर्भ -**


- फाडिया बी. एल -"समकालीन राजनैतिक मुद्दे" साहित्य भवन प्रकाशन आग्रा.
- सिंह.एस -"संविधान और मानवाधिकार"ओमेगा पब्लिकेशन्स,नई दिल्ली.
- पाटील व्ही. बी."मानवी हक्क"के.सागर,पुणे,
- Soni S.K - "Human Rights,Concepts, Issues,Emerging problem",
- Royal publication,New Delhi,2007.
- सिंहल,एस.पी. "आंतरराष्ट्रीय संबंध"लक्ष्मीनारायण अग्रवाल प्रकाशन, आगरा. २०२१
- नाटानणी,पी.एन. "मानवाधिकार और कर्तव्य"अविष्कार पब्लिशर्स जयपुर,२००७.